# एन. पी. ए. संकल्पना पतसंस्थांसाठी वरदान

गेल्या १५ वर्षांपासून राष्ट्रीयकृत, खाजगी व नागरी सहकारी बँकांच्या लेखा पध्दतीत सुधारणा झालेली आहे. त्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने ह्या बँकांसाठी प्रुडेंशियल नॉर्म्स लागू केलेले आहेत. आणि त्याचाच परिणाम आपल्या भारतातील बँकिंग व्यवस्थेवर होऊन प्रत्यक्ष उत्पन्नावर आधारित ॲसेट क्लासिफिकेशन सुध्दा करण्यात आले. आणि ज्या वेळेला ही संकल्पना लागू केली त्यावेळी, नागरी बँकानाही ही पध्दत अडचणीची वाटली होती. परंतु बँकांचे आर्थिक व्यवहार व्यापक होण्यासाठी ही पध्दत आवश्यकच होती हे, कालांतराने सर्व बँका मान्य करु लागल्या. आणि त्याचा म्हणजेच ह्या **एन. पी. ए. संकल्पनेचा खऱ्या अर्थाने फायदा बँकांना झाला.** आणि ही बँकिंगमधील सहकारी चळवळ जनतेच्या पैशाच्या संरक्षण व संवर्धनासाठी हितकारक ठरली.

सहकारी चळवळीमध्ये आपले महाराष्ट्र राज्य हे देशात अग्रेसर असे राज्य आहे. भारत सरकारने आर्थिक उदारीकरणाची निती सन १९९१ मध्ये अवलंबल्यानंतर भारताच्या औद्योगिक व व्यापार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झालेले आहे. ह्या क्षेत्रातील उलाढालीत वाढ होण्यासाठी मदत व्हावी म्हणून,आर्थिक क्षेत्रात सुधारणा होण्यासाठी सरकारने **वरील कारणास्तव नरसिंहम समिती नेमली होती.** ह्या समितीने भारतीय बँकिंग, लेखा पध्दती व मानके संबंधी अभुतपूर्व अशा सुधारणांसाठी शिफारस केली होती आणि त्याचाच सुपरिणाम एन. पी. ए. ही संकल्पना बँकांसाठी लागू होऊन, आपल्या राज्यात पतसंस्थांसाठी देखील लागू करून एक प्रकारचे वरदान या क्षेत्राला प्राप्त झालेले आहे.

महाराष्ट्र राज्यात २५ हजारांच्यावर सहकारी पतसंस्था असून सर्व सामान्य जनतेच्या ३५ हजार कोटी रूपयांच्यावर ठेवी आहेत. सर्वसामान्य जनतेने पतसंस्थांच्या सहकारी चळवळीवर टाकलेला विश्वास आणखी वाढावा आणि पतसंस्था सुध्दा आर्थिकदृष्टया सक्षम व्हाव्यात यासाठी, पतसंस्थांमध्ये बँकांमध्ये अस्तित्वात असलेली लेखा पध्दत अमलात आणण्याचे धोरण स्विकारण्यात आले.

गेल्या काही वर्षांचा मागोवा घेतला तर पतसंस्थांच्या नोंदणीनंतर त्या सक्षमपणे चालविणे व वाढविणे हे जिकरीचे काम होऊन बसले होते. ठेवीदारांचे व सभासदांचे हित सुध्दा जपण्याची जबाबदारी दिवसेंदिवस पतसंस्थांवर वाढत चालली होती. पतसंस्थांवरील जनतेचा विश्वास जरासुध्दा डळमळीत होऊ नये ह्यासाठी, पतसंस्था चळवळीतील कार्यकर्ते जागृतपणे काम करण्यास सरसावले. **आर्थिक व्यवहारात काही प्रमाणात प्रत्येक ठिकाणी जोखीम असू शकते,** ह्या मुळ तत्वानुसार पतसंस्थांनी या जोखमीवर सुध्दा मात करता येईल, अशा प्रकारची व्यवस्था पतसंस्थांच्या लेखा पध्दतीत ठेवणे आवश्यक असल्याचे मनोमन केव्हाच स्विकारले होत. आणि या सर्वांचा विचार करूनच बँकांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने जी लेखा पध्दत निश्चित केली होती, तशाच प्रकारची पध्दत पतसंस्थांच्या कारभारात एन.पी.ए. ही संकल्पना आणून राज्यातील पतसंस्थांना लागू केली.

पतसंस्था ह्या प्रामुख्याने स्थानिक स्तरावर काम करीत असतात. छोट्या भाग - भांडवलातून त्यांची सुरवात होते. आणि त्यामध्ये हळुहळू भर पडत जाते. सुरवातीच्या काळात जोखीम पत्करण्याची ताकद पतसंस्थांमध्ये अत्यल्प भाग भांडवलामुळे कमी असल्याने, पतसंस्थांना त्यांचा निधी काळजीपूर्वक हाताळावा लागतो. **एखादे कर्ज एन.पी.ए. झाले तर, त्यासाठी तरतुद करणे हेच एक त्यामधील महत्वाचे सुत्र आहे**. ह्यापुर्वी चालत आलेल्या पतसंस्थांच्या लेखा पध्दतीमध्ये १०० टक्के बदल लगेच केला तर, त्याची अंमलबजावणी करणे अवघड होईल म्हणून एन. पी. ए. ही संकल्पना टप्याटप्याने लागू करणे आवश्यक ठरविण्यात आले. **दिनांक ३१/०३/२००५ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षापासून सदर तरतुदी पतसंस्थांसाठी लागू करण्यात आल्या.** उत्तम आणि नियमित कर्जासाठी एन. पी. ए. ची तरतुद करण्यात आलेली नव्हती. मात्र अनियमित कर्ज ५ टक्के, संशयित कर्ज क्र. १,२ व ३ साठी अनुक्रमे तारणी व

विनातारणी तरतुदी करण्याच्या धोरणांचा स्विकार करण्यात आला.

पतसंस्था त्यांचे वार्षिक ताळेबंद पत्रक, हिशोब पत्रक तयार करताना प्रत्यक्षात वसुल न झालेले व्याज उत्पन्न म्हणून धरून नफा जाहीर करण्याची पध्दत एन. पी. ए. संकल्पना अमलात येण्यापूर्वी करीत होती. त्या अनुषंगाने लाभांषसुध्दा जाहीर करीत होती. इतकेच नव्हे तर निधीसुध्दा न मिळालेल्या उत्पन्नातून करताना निदर्शनास येत होता. त्यामुळे पतसंस्थांच्या ताळेबंदामध्ये खऱ्या आर्थिक स्थितीचे दर्शन होत नव्हते. पतसंस्थेचे सभासद, ठेवीदार यांच्या रकमांचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता मोठ्या अडचणींना पतसंस्थांना सामोरे जावे लागत होते. आणि ह्यावर पूर्णपणे मात करण्यासाठी नरसिंहम समितीने नागरी बँकांच्या पारदर्शक ताळेबंदाप्रमाणे व ह्या ताळेबंदामध्ये मालमत्तेचे वर्गीकरण योग्य प्रकारे करण्यात यावे, यासाठी पतसंस्थांचे उत्पादक व अनुत्पादक असे दोन भाग केले.

**पतसंस्था ह्या राज्याच्या आर्थिक क्षेत्रात अत्यंत महत्वाची भुमिका पार पाडीत असल्याने** पतसंस्थांच्या लेखा पध्दतीत एकसुत्रीपणा व पारदर्शकता आणण्यासाठी व संस्था खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी पतसंस्थांना एन. पी. ए. निकष लागू झाल्यामुळे सर्वांसाठी फायदेशीर ठरले आहे. **पतसंस्थांचे ताळेबंद व हिशोबपत्रक योग्य आर्थिक स्थिती दर्शविण्यासाठी एन. पी. ए. निकषांचा खऱ्या अर्थाने फायदा झाला.** उत्पन्न क्षमता नसलेल्या कर्ज खात्यावर आकारलेले व्याज प्रत्यक्ष वसुल झाल्याखेरीज अशा प्रकारचे व्याज उत्पन्नात धरण्याचे बंद झाले. आणि हेच महत्वाचे तत्व एन. पी. ए. च्या संकल्पनेत आहे. **ज्या कर्ज खात्यातून अथवा इतर मालमत्तेपासून उत्पन्न मिळत नाही असे कर्ज खाते अथवा मालमत्ता उत्पन्न क्षमता नसलेले एन. पी. ए. समजावे**. एखादे कर्ज उत्पन्न निर्मिती करण्यास जेव्हा असमर्थ ठरते अथवा उत्पन्न निर्मिति करीत नाही तेव्हा, ते कर्ज एन. पी. ए. समजावे. **एन. पी. ए. म्हणजे एखाद्या कर्ज खात्यावरील मुद्दल / व्याजाचा हप्ता हा कर्ज रोख्यामध्ये व ठराव केलेल्या कालावधि नंतरही वसुल न झाल्यास असे खाते आपोआप एन. पी. ए. होते.**

जेव्हा ठरलेल्या कर्जाचा हप्ता / व्याज भरले जात नाही तेव्हा, ते खाते / रक्कम थकबाकी मानावी. थकबाकी भरण्याच्या नियत तारखेशी संबंधित असतो. **एन. पी. ए. खात्याचा ठराविक मुदतीशी संबंध असतो.** उदा. ३६० दिवस कर्जाचा हप्ता / व्याज न आल्यास खाते एन. पी. ए. होते. म्हणजेच निश्चित केलेल्या कालावधीत कर्जाचा हप्ता / व्याज न आल्यास खाते एन. पी. ए. समजले जाते. भारतीय रिझर्व्ह बँकेने १९९३ सालापासून बँकांना ही एन. पी. ए. संकल्पना लागू केली. पतसंस्थांच्या बाबतीत कोणत्याही कर्ज खात्यातील थकबाकीची रक्कम म्हणजेच कर्जाचा हप्ता व व्याज जर ४ तिमाही (१२ महिने) पेक्षा अधिक काळ थकित राहिले तर, असे कर्ज किंवा खाते उत्पन्न क्षमता नसलेले खाते समजण्यात येते. पतसंस्थांनी अशा कर्ज खात्यावर व्याज काढावे. परंतु व्याजाची आकारणी मात्र करु नये. महत्वाची दुसरी गोष्ट म्हणजे **कर्ज खाते एन. पी. ए. ठरविताना कर्जदार अथवा जामिनदार यांनी दिलेले तारण अथवा त्यांची खरी किंमत विचारात घेऊ नये**. तर अशा तारणाच्या किमतीचा विचार एन. पी. ए. तरतुद करताना करावा लागतो. पतसंस्थांनी ३१ मार्च अखेर एन. पी. ए. खात्यात कर्जाचा हप्ता / व्याज रक्कम जर जमा केली नसेल तर एन. पी. ए. चे वर्गीकरण कालावधीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे करावे.

नागरी / ग्रामीण सहकारी पतसंस्था परिपत्रके पान क्र. ८० वरील उत्तम कर्ज खाते / नियमित कर्ज खाते या मुद्दयापासून पान क्र. ८८ पर्यंत टाईप करणे बाकी आहे.

म्हणून, पतसंस्थांनी या निमित्ताने ३१ मार्च २००८ या आर्थिक वर्षा अखेरच्या ताळेबंदात जागृतपणे एन. पी. ए. निकषांचे काटेकोर पालन करून **स्वत:ची पतसंस्था आणखी आर्थिक सक्षम बनवावी** असे आवाहन करण्यात येत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**